# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
## जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
☎ ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल ✉: cpromhadaoffice@gmail.com


==========================================================================

जावक क्रमांक – ८१९/९५ दिनांक :- १९ जुलै, २०२५

प्रसिद्धिपत्रक

**म्हाडा पुणे मंडळातर्फे सोलापूर जिल्ह्यातील रे नगर प्रकल्पाच्या आवारात २० हजार वृक्ष लागवडीचा शुभारंभ**

'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजय जयस्वाल यांच्या हस्ते वृक्षारोपण

मुंबई, दि. १९ जुलै, २०२५ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळातर्फे सोलापूर जिल्ह्यातील कुंभारी येथील रे नगर प्रकल्पाच्या आवारात वनमहोत्सवाअंतर्गत २ लाख वृक्ष लागवड मोहिमेअंतर्गत आज २० हजार वृक्ष लागवडीचा शुभारंभ 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या हस्ते करण्यात आला.

या ठिकाणी सुमारे २०,००० देशी प्रजातींच्या, २-३ वर्षे वाढलेले वृक्ष लागवडीचा करण्यात येत आहे. वृक्ष लागवडीसाठी निवडलेला भूखंड कुंपणाने सुरक्षित करण्यात आला असून बांबूच्या झाड संरक्षकांचाही वापर करण्यात आला आहे. या परिसरात प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत राज्यातील सर्वात मोठा ३०,००० घरांचा प्रकल्प राबविण्यात येत असून त्यातील १५,००० घरे माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लाभार्थ्यांना सुपूर्द करण्यात आली आहेत.

म्हाडातर्फे सामाजिक बांधिलकी जपत आणि निसर्ग संवर्धनाचा संकल्प दृढ करत वन महोत्सव अंतर्गत राज्यात विविध ठिकाणी दोन लाख झाडांची लागवड करण्याची महत्त्वाकांक्षी मोहीम हाती घेण्यात आली आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून आज सोलापूर येथे असंघटित कामगारांसाठी उभारण्यात येत असलेल्या 'रे नगर वसाहत' परिसरात सुमारे २० हजार स्थानिक प्रजातींच्या झाडांची लागवड करण्यात येत आहे. या मोहिमेचा उद्देश भविष्यातील पिढ्यांसाठी हरित पट्टा तयार करून पर्यावरणाचा समतोल राखणे आणि शाश्वत विकासास चालना देणे असा आहे. लागवड क्षेत्र संरक्षित करण्यात आले असून झाडांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक संरक्षक उपाययोजनाही करण्यात आल्या आहेत.

यावेळी 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी उर्वरित प्रगत कामांचा आढावा आज घेतला असून लाभार्थ्यांना स्थलांतर केल्यानंतर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यासंदर्भात गारमेंट मिल असोसिएशन, बीडी युनिट असोसिएशन आणि पापड फॅक्टरी असोसिएशन यांच्यासमवेत बैठक घेण्यात आली. या माध्यमातून स्थानिक स्तरावर सुमारे १५,००० लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे नियोजन असून डिसेंबर अखेरपर्यंत या प्रकल्पांची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु होईल. या बैठकीला स्थानिक लोकप्रतिनिधी आणि व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी हजेरी लावून समन्वयाचे काम पाहण्याची जबाबदारी स्विकारली आहे.

वन महोत्सवाअंतर्गत म्हाडा पुणे मंडळातर्फे दहिटणे (सोलापूर शहर हद्दीत) येथे राष्ट्रतेज अटल या गृहनिर्माण प्रकल्पाच्या आवारात १,२०० झाडे लावण्यात आली. याच ठिकाणी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत १,२०० घरे बांधण्यात आली असून लवकरच सन्माननीय मुख्यमंत्री यांच्या हस्ते लाभार्थ्यांना सदनिकांचा ताबा दिला जाणार आहे. या ठिकाणी आरोग्य केंद्र, ई-लायब्ररी, अंगणवाडी, समुदाय भवन, सौरऊर्जेवर आधारित रस्त्यांची दिवे, तसेच बालकांसाठी खेळण्याचे साहित्य व ओपन जिम यांसारख्या अतिरिक्त सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन म्हाडाचे उपाध्यक्ष श्री. जयस्वाल यांनी दिले.

सदर कार्यक्रमाला स्थानिक आमदार श्री. विजय देशमुख, मुंबई इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद शंभरकर, पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. राहुल साकोरे, मुख्य अभियंता श्री. सुनील

ननावरे, वित्त नियंत्रक श्री. अजयसिंह पवार, मुंबई इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळाचे सहमुख्य अधिकारी श्री. उमेश वाघ, मुंबई मंडळाच्या सहमुख्य अधिकारी श्रीमती वंदना सूर्यवंशी, कोकण मंडळाच्या मुख्य अधिकारी श्रीमती रेवती गायकर, उपमुख्य अभियंता श्री. अनिल अंकलगी, कार्यकारी अभियंता श्री. वैभव केदारे आदी उपस्थित होते.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा





---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East,
Mumbai-400051. ☎ 022-55405066/77. Email : cpromhadaoffice@gmail.com

====================================================

Outward No. : 819/95 Dt. 19th July 2025

**Press Release**

**MHADA Pune Board Launch of 20,000 Tree Plantation Drive at MHADA's RAY Nagar Project Site in Solapur District**

Tree plantation conducted by MHADA Vice President and CEO Mr. Sanjeev Jaiswal

**Mumbai, July 19, 2025** – Under the Van Mahotsav initiative, the Pune Housing and Area Development Board of the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) has launched a campaign to plant 2 lakh trees. As part of this initiative, 20,000 trees were planted today at the RAY Nagar project premises in Kumbhari, Solapur district. The plantation was formally inaugurated by Mr. Sanjeev Jaiswal (IAS), Vice President and Chief Executive Officer of MHADA.

Approximately 20,000 native species of trees, aged 2–3 years, are being planted at this location. The selected land for the plantation has been secured with fencing, and bamboo guards are being used to protect the saplings. This area is also home to the largest housing project under the Pradhan Mantri Awas Yojana (Urban) in the state, which includes 30,000 homes. Of these, 15,000 homes have already been handed over to beneficiaries by Hon. Prime Minister Shri Narendra Modi.
Demonstrating social responsibility and a commitment to environmental conservation, MHADA has taken up this ambitious initiative to plant two lakh (200,000) trees across the state under the Van Mahotsav program. As part of this effort, around 20,000 local species of trees are being planted in the Re Nagar housing area being developed for unorganized workers in Solapur. The goal of the campaign is to create a green zone for future generations, maintain ecological balance, and promote sustainable development. The plantation area has been secured and protective measures have been taken to ensure the trees’ safety.

During the event, Mr. Sanjeev Jaiswal, Vice President and CEO of MHADA reviewed the progress of the ongoing projects. He emphasized creating employment opportunities for the relocated beneficiaries. In this regard, meetings were held with the Garment Mill Association, Bidi Unit Association, and Papad Factory Association. A plan is in place to generate employment for approximately 15,000 people at the local level, with the actual implementation of these projects expected to begin by the end of December. Solapur District Collector Kumar Aashirwad also attended the meeting via video conference and has taken responsibility for coordinating these efforts.
As part of the Van Mahotsav celebrations, MHADA Pune Board also planted 1,200 trees at the Rashtretej Atal Housing Project site in Dahitane (within Solapur city limits). Under the Pradhan Mantri Awas Yojana (Urban), 1,200 homes have been built at this site, and soon, the keys will be handed over to beneficiaries by the Hon. Chief Minister. Mr. Jaiswal assured that additional amenities will be provided at this location, including a health center, e-library, anganwadi (childcare center), community hall, solar-powered street lights, children's play equipment, and an open gym.

The event was attended by local MLA Mr. Vijay Deshmukh; Mr. Milind Shambharkar, Chief Officer of Mumbai Building Repairs and Reconstruction Board; Mr. Rahul Sakore , Chief Officer of Pune Board; Mr. Sunil Nanavare, Chief Engineer; Mr. Ajaysingh Pawar, Finance Controller; Mr. Umesh Wagh, Joint Chief Officer of Mumbai Building Repairs and Reconstruction Board; Mrs. Vandana Suryawanshi, Joint Chief Officer of Mumbai Board; Mrs. Revati Gaikar, Chief Officer of Konkan Board; and Mr. Anil Ankalgi, Deputy Chief Engineer, Mr. Vaibhav Kedare, Executive Engineer among others.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA

--------------------------------------------------------------------------------

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial